नाशिक वन विभागातील ४४ मजूरासंदर्भांत मा.औद्योगिक, नाशिक यांनी तक्रार युएलपी क्र.३२०/१९९७, ६३६/९८, ६३/९९, ३०/९९, ३४/२००० व २४४ ते २४९/२००० मध्ये, दि.०६/०३/२००२ तसेच, मा. उच्च न्यायालय, मुंबई यांनी रिट याचिका क्र.६३९८/२००३ मध्ये, दि.०६/११/२०२३ व पुनर्विलोकन याचिका क्र.७३१४/२०२५ मध्ये, दि.१९/०६/२०२५ रोजी दिलेल्या निर्णयाची अंमलबजावणी करण्याच्या अनुषंगाने त्यांच्याकरीता दि.०६/०३/२००२ पासून ४४ अधिसंख्य वनमजूराचे पद निर्माण करुन ३७ मजूरांना वेतन व मजूरीच्या थकबाकीपोटी रु.१,०३,०३,४५३/- इतकी रक्कम अदा करण्बाबत.

महाराष्ट्र शासन
महसूल व वन विभाग
शासन निर्णय क्रमांक : एस-३०/२०२४/प्र.क्र.४०/वने-१२
हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२
दिनांक :- ३० जुलै, २०२६.

<u>वाचा :-</u> १) मा. औद्योगिक न्यायालय, नाशिक यांचा तक्रार युएलपी क्र.३२०/१९९७, ६३६/९८, ६३/९९, ३०/९९, ३४/२००० व २४४ ते २४९/२००० मध्ये, दि.०६/०३/२००२ चा न्याय निर्णय.

२) मा. उच्च न्यायालय, मुंबई यांचा रिट याचिका क्र.६३९८/२००३ मधील दि.०६/११/२०२३, दि.१४/०४/२०२४ व दि.१७/०४/२०२४ चा न्याय निर्णय.

३) मा. उच्च न्यायालय, यांचा पुनर्विलोकन याचिका क्र.७३१४/२०२५ मधील दि.१९/०६/२०२५ चा न्याय निर्णय.

४) प्रधान मुख्य वनसंरक्षक (वनबल प्रमुख), नागपूर यांच्या कार्यालयाचे पत्र क्र.कक्ष-३१/विधी/७(२)/प्र.क्र.०१(२४-२५)/३६३/२५-२६, दि.१६/०६/२०२५.

५) उप वनसंरक्षक, पुर्व भाग नाशिक यांचे पत्र क्र.अ/न्यायालयीन प्रकरण/३२६/२०२५-२६, दि.१७/०६/२०२५.

६) वित्त विभाग, शासन परिपत्रक, क्र.वेतन-१०१८/प्र.क्र.३४/सेवा-३, दि.१७/०८/२०२३.

<u>प्रस्तावना :-</u>

नाशिक जिल्हा वन श्रमिक संघ, अहमदनगर यांनी नाशिक वन विभागातील ४४ रोजंदारी मजूरांना शासन सेवेत कायम करण्याच्या मागणीकरीता मा. औद्योगिक न्यायालय, नाशिक येथे तक्रार युएलपी क्र.३२०/१९९७, ६३६/९८, ६३/९९, ३०/९९, ३४/२००० व २४४ ते २४९/२००० दाखल केल्या होत्या. त्यामध्ये मा. औद्योगिक न्यायालयाने संबंधित मजूरांना नियमित सेवा व अनुषंगिक लाभ देण्याचे आदेश दि.०६/०३/२००२ रोजी पारित केले.

२. सदर ४४ रोजंदारी मजूरांपैकी २४ मजूरांकडून शासन निर्णय, दि.१६/१०/२०१२ व दि.१०/०५/२०१८ मधील तरतुदींची पुर्तता झाल्याने त्यांना दि.०१/०६/२०१२ पासून अधिसंख्य वनमजूर या पदावर नियमित करण्यात आले होते.

३. मा. औद्योगिक न्यायालयाच्या उपरोक्त दि.०६/०३/२००२ रोजीच्या निर्णयाविरुध्द विभागाच्या वतीने मा. उच्च न्यायालय, मुंबई येथे रिट याचिका क्र.६३९८/२००३ दाखल करण्यात आली. त्यामध्ये मा. उच्च न्यायालयाने दि.०६/११/२०२३, दि.१४/०४/२०२४ व दि.१७/०४/२०२४ च्या आदेशान्वये मा.औद्योगिक न्यायालयाचा दि.०६/०३/२००२ चा निर्णय कायम केला आहे.

४. मा. उच्च न्यायालयाच्या दि.०६/११/२०२३ च्या निर्णयाविरुध्द मा. उच्च न्यायालय, मुंबई येथे शासनाच्या वतीने पुनर्विलोकन याचिका क्र.७३१४/२०२५ दाखल करण्यात आली. त्यामध्ये मा. न्यायालयाने त्यांच्या दि.१९/०६/२०२५ च्या आदेशान्वये क्षेत्रिय कार्यालयाच्या दि.१६/०६/२०२५ व दि.१७/०६/२०२५ या दोन पत्रांचा एकत्रित विचार करुन गुणवत्तेनुसार निर्णय घेवून अनुपालन अहवाल सादर करण्याचे निर्देश याचिकाकर्ता यांना दिले.

५. मा. उच्च न्यायालयाच्या दि.०६/११/२०२३ च्या आदेशाची अंमलबजावणी न झाल्यामुळे तक्रारदार यांनी मा. उच्च न्यायालय, मुंबई येथे अवमान याचिका क्र.४०/२०२६ व क्र.४१/२०२६ दाखल केली आहेत.

६. अवमान याचिका क्र.४० व ४१/२०२६ मध्ये दि.२६/०३/२०२६ रोजी मा. उच्च न्यायालयाने दिलेले आदेश विचारात घेऊन, शासन परिपत्रक, विधी व न्याय विभाग, दि.२८/०२/२०१७ मधील सूचनानुसार विहित कार्यपध्दत अनुसरुन पुढील योग्य तो निर्णय घेण्यास विभाग सक्षम असल्याचे अभिमत विधी व न्याय विभागाने दिले आहे.

७. प्रस्तुत प्रकरणी पुनर्विलोकन याचिका (स्टॅम्प) क्र.७३१४/२०२५ मधील मा.उच्च न्यायालयाच्या दि.१९/०६/२०२५ आदेशात निर्देशित केल्यानुसार क्षेत्रिय कार्यालयाच्या दि.१६/०६/२०२५ व दि.१७/०६/२०२५ च्या पत्रातील प्रस्तावाच्या अनुषंगाने उपरोक्त अनुक्रमांक (२) नुसार अधिसंख्य वनमजूर म्हणून नियमित झालेल्या (एकंदर २४) व यापुर्वी शासन निर्णय दि.१६/१०/२०१२ व दि.१०/०५/२०१८ नुसार नियमित न झालेल्या (एकंदर २०) अशा एकंदर ४४ रोजंदारी मजूरांना दि.०६/०३/२००२ पासून अधिसंख्य वनमजूर म्हणून नियमित करणे व त्यातील **३७ मजूरांना** "काम नाही वेतन नाही" या तत्वानुसार वेतन व मजूरीच्या थकबाकीपोटी रु.१,०३,०३,४५३/- इतकी रक्कम विभागून **अदा करण्याबाबतची** बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**<u>शासन निर्णय :-</u>**

नाशिक वन विभागातील ४४ मजूरासंदर्भात मा. औद्योगिक, नाशिक यांनी तक्रार युएलपी क्र.३२०/१९९७, ६३६/९८, ६३/९९, ३०/९९, ३४/२००० व २४४ ते २४९/२००० मधील, दि.०६/०३/२००२ रोजीचा निर्णय मा. उच्च न्यायालय, मुंबई यांनी रिट याचिका क्र.६३९८/२००२ मधील, दि.०६/११/२०२३ दि.१४/०४/२०२४ व दि.१७/०४/२०२४ च्या निर्णयाव्दारे कायम केला आहे.सदर दि.०६.११.२०२३ च्या निर्णयाचे पुनर्विलोकन करण्यासाठी दाखल केलेल्या पुनर्विलोकन याचिका क्र.७३१४/२०२५ मध्ये, दि.१९/०६/२०२५ रोजी दिलेल्या सुधारित निर्णयाची अंमलबजावणी करण्याचा भाग म्हणून क्षेत्रिय कार्यालयाच्या दि.१६/०६/२०२५ व दि.१७/०६/२०२५ रोजी सादर

केलेल्या प्रस्तावानुसार (सोबत जोडलेल्या परिशिष्ट "अ" येथील तक्त्यानुसार) ४४ मजूरांकरीता अधिसंख्य पदांचा कालावधी योग्य असल्याची खातरजमा क्षेत्रिय कार्यालयाची राहील या अटींच्या अधीन राहून सदर ४४ मजूरांकरीता दि.०६/०३/२००२ पासून सेवानिवृत्ती पर्यंत अथवा पद रिक्त होईपर्यंत, जे अगोदर घडेल किंवा तक्त्यात नमूद कालावधीसाठी ४४ अधिसंख्य वन मजूर पद निर्माण करण्यास तसेच सदर ४४ मजुरांपैकी संबंधित ३७ मजूरांना वेतन व मजूरीच्या थकबाकीपोटी रु.१,०३,०३,४५३/- (एक कोटी तीन लाख तीन हजार चारशे त्रेप्पन्न फक्त) इतकी रक्कम अनुज्ञेयतेनुसार विभागून अदा करण्यास या शासन निर्णयाव्दारे शासन मान्यता देण्यात येत आहे.

२. उक्त खर्च, मागणी क्रमांक सी-७, २४०६ वनीकरण व वन्यजीवन, १०१ वनसंरक्षण, विकास व पुनर्निर्मिती, (१२) वन कामगारांसाठी अधिसंख्य पदांची निर्मिती, (१२) (०१) वन कामगारांसाठी अधिसंख्य पदांची निर्मिती (अनिवार्य), (२४०६-१८९८) ०१-वेतन या लेखाशिर्षातंर्गत सन २०२६-२७ या वित्तीय वर्षात मंजूर तरतुदीतून भागविण्यात यावा.

३. सदर प्रकरणी न्यायालयीन प्रकरणाची संपूर्ण जबाबदारी क्षेत्रिय कार्यालयाची राहील तसेच, सदरहू ३७ मजूरांना अदा करावयाच्या रक्कमेची अचूक परिगणना अचूक असल्याची जबाबदारी मुख्य वनसंरक्षक (प्रादेशिक), नाशिक यांच्या कार्यालयाची राहील. तसेच वाचा येथील अ.क्र.०८, वित्त विभाग, शासन परिपत्रक दि.१७/०८/२०२३ मधील मागदर्शक तत्वाची काटेकोरपणे अंमलबजावणी करावी.

४. सदर ४४ मजूरांपैकी ज्या २४ रोजंदारी मजूरांना शासन निर्णय, दि.१६/१०/२०१२ मधील तरतुदीनुसार दि.०१/०६/२०१२ पासून अधिसंख्य वनमजूर म्हणून नियमित करण्यात आले आहे, त्या संबंधितांना या शासन निर्णयाव्दारे दि.०६/०३/२००२ पासून अधिसंख्य वनमजूर म्हणून नियमित करण्यात येणार असल्याने त्यांना दि.०१/०६/२०१२ पासून नियमित केल्याबाबतचे आदेश, आपोआप अधिक्रमित होतील.

५. सदरचा शासन निर्णय, वित्त विभाग, अनौ.संदर्भ क्र.४८१/व्यय-१०, दि.२८/०७/२०२६ व अनौपचारिक संदर्भ क्र.२०२/आपुक, दि.३०/०७/२०२६ अन्वये प्राप्त झालेल्या सहमतीस अनुसरुन निर्गमित करण्यात येत आहे.

६. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक क्र. २०२६०७३०१०५४३६३९४० असा आहे. सदरचा शासन निर्णय डिटीजल स्वाक्षरीने सांक्षाकीत करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

BHAGWAN MARUTI SAWANT

Digitally signed by BHAGWAN MARUTI SAWANT
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=REVENUE AND FORESTS DEPARTMENT,
2.5.4.20=8EE89EB0AEC64F8BC0BDF8D85DDB4706D35ABD8B73C618E114EE98D5C9ECF57B, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=C7DBA1C6B5F7AB2A6CABC4F7EAD8CFA74F8F7A0FADCAC76D8F1CF22569F16BD3, cn=BHAGWAN MARUTI SAWANT
Date: 2026.07.30 10:55:49 +05'30'

**( भगवान सावंत )**

**उप सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रति,**

१. प्रधान मुख्य वनसंरक्षक (वनबल प्रमुख), महाराष्ट्र राज्य, नागपूर.

२. अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (प्रशासन-दुय्यम संवर्ग), महाराष्ट्र राज्य, नागपूर.

३. अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (अर्थसंकल्प, नियोजन व विकास), महाराष्ट्र राज्य, नागपूर.

४. महालेखापाल-१/२ (लेखा परीक्षा/ लेखा व अनुज्ञेयता) महाराष्ट्र राज्य, मुंबई / नागपूर.
५. मुख्य वनसंरक्षक (प्रादेशिक), नाशिक.
६. उपवनसंरक्षक,पूर्व भाग नाशिक .
७. जिल्हा कोषागार अधिकारी, नाशिक.
८. कार्यासन अधिकारी (व्यय-१० / आपुक), वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई.
९. कार्यासन अधिकारी (ब-१ / वने-२), महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई.
१०. निवडनस्ती (वने-१२), महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई.

## परिशिष्ट “अ”

सदरहू ४४ संबंधित मजूरांपैकी २४ मजूरांना शासन निर्णय, दि.१६/१०/२०१२ मधील तरतुदीनुसार दि.०१/०६/२०१२ पासून शासन सेवेत अधिसंख्य वनमजूर या पदावर नियमित करण्यात आले आहे. सदरहू २४ वनमजूरांना दि.०६/०३/२००२ पासून अधिसंख्य वनमजूर म्हणून कायम केल्यास त्यांना पुढीलप्रमाणे थकबाकी अनुज्ञेय ठरते. त्याबाबतचा तपशील खालीलप्रमाणे आहे :-

| अ.क्र. | नांव | जन्म तारीख | कालावधी | रक्कम |
|---|---|---|---|---|
| १ | श्री. एस. व्ही. शेवाळे | दि.०१/०६/१९६२ | दि.०६/०३/२००२ ते दि.३१/०५/२०१२ | रु.६५,३३०/- |
| २ | श्री. एम. व्ही. पवार | दि.०५/०६/१९६१ | दि.०६/०३/२००२ ते दि.३१/०५/२०१२ | रु.५,४०,९२०/- |
| ३ | श्री. डी. झेड. पवार | दि.०६/०५/१९५९ | दि.०६/०३/२००२ ते दि.३१/०५/२०१२ | रु.३,७२,५९१/- |
| ४ | श्री. डी. एस. कामडी | दि.०६/०२/१९७० | दि.०६/०३/२००२ ते दि.३१/०५/२०१२ | रु.२,९०,८९२/- |
| ५ | श्री. एस. एम. कचवे | दि.०१/०६/१९५५ | दि.०६/०३/२००२ ते दि.३१/०५/२०१२ | रु.६१,७६६/- |
| ६ | श्री. टी. पी. सोनावणे | दि.०१/०१/१९६५ | दि.०६/०३/२००२ ते दि.३१/०५/२०१२ | रु.२,४०,३१४/- |
| ७ | श्री. पंडीत सोनावणे | दि.०४/०६/१९७२ | दि.०६/०३/२००२ ते दि.३१/०५/२०१२ | रु.८४,६९८/- |
| ८ | श्री. बी. एस. पदमार | दि.०१/०१/१९६४ | दि.०६/०३/२००२ ते दि.३१/०५/२०१२ | रु.६२,५६६/- |
| ९ | श्री. के. ए. वाळके | दि.०१/०६/१९६५ | दि.०६/०३/२००२ ते दि.३१/०५/२०१२ | रु.३५,४०४/- |
| १० | श्री. व्ही. डी. बागुल | दि.०२/०६/१९६८ | दि.०६/०३/२००२ ते दि.३१/०५/२०१२ | रु.५,०८,९२१/- |
| ११ | श्री. आर. पी. पवार | दि.०६/०१/१९५६ | दि.०६/०३/२००२ ते दि.३१/०५/२०१२ | रु.५,४८,२४८/- |
| १२ | श्री. सी. जी. पवार | दि.०७/०२/१९५७ | दि.०६/०३/२००२ ते दि.३१/०५/२०१२ | रु.५,२३,९९९/- |
| १३ | श्री. एन. के. अहिरे | दि.०१/०६/१९६२ | दि.०६/०३/२००२ ते दि.३१/०५/२०१२ | रु.३,३५,८६७/- |
| १४ | श्री. पांडुरंग जी. सोनवणे | दि.०१/०६/१९६० | दि.०६/०३/२००२ ते दि.३१/०५/२०१२ | रु.३,१०,७२७/- |
| १५ | श्री. ए. वाय. पवार | दि.०५/०९/१९६६ | दि.०६/०३/२००२ ते दि.३१/०५/२०१२ | रु.५,५१,८३२/- |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १६ | श्री. के. आर. सोनवणे | दि.०१/०१/१९७१ | दि.०६/०३/२००२ ते दि.३१/०५/२०१२ | रु.९१,५०३/- |
| १७ | श्री. पी. ए. धोंडगे | दि.०१/०६/१९५८ | दि.०६/०३/२००२ ते दि.३१/०५/२०१२ | रु.८९,१३१/- |
| १८ | श्री. एम. एम. बच्छाव | दि.०१/०६/१९७१ | दि.०६/०३/२००२ ते दि.३१/०५/२०१२ | रु.२,६४,८१२/- |
| १९ | श्री. वाय. एल. बाविस्कर | दि.०१/०१/१९७२ | दि.०६/०३/२००२ ते दि.३१/०५/२०१२ | रु.५,४८,२०७/- |
| २० | श्री. एस. एम. कामडी | दि.०१/०६/१९६६ | दि.०६/०३/२००२ ते दि.३१/०५/२०१२ | रु.२,९०,८९२/- |
| २१ | श्री. बी. एल. चौधरी | दि.१०/०४/१९६१ | दि.०६/०३/२००२ ते दि.३१/०५/२०१२ | रु.५९,८३४/- |
| २२ | श्री. आय. एम. धुळे | दि.०१/०६/१९५६ | दि.०६/०३/२००२ ते दि.३१/०५/२०१२ | रु.६,९६४/- |
| २३ | श्री. अब्दुल अब्बार हसन पटेल | दि.१४/११/१९७५ | दि.०६/०३/२००२ ते दि.३१/०५/२०१२ | रु.३,३२,८३३/- |
| २४ | श्री. टी. एच. पवार | दि.०८/०४/१९६६ | दि.०६/०३/२००२ ते दि.३१/०५/२०१२ | रु.४२,३१९/- |
| एकूण रक्कम | | | | रु.६२,६०,५७०/- |

उर्वरित २० मजूरांकडून सदर शासन निर्णय, दि.१६/१०/२०१२ व दि.१०/०५/२०१८ मधील तरतुदींची पुर्तता झाली नसल्याने त्यांना अधिसंख्य वनमजूर पदावर नियमित करता येवू शकले नाही. त्यांना न्यायनिर्णयानुसार दि.०६/०३/२००२ पासून शासन सेवेत अधिसंख्य वनमजूर पदावर नियमित करणे व थकबाकीची रक्कम मंजूर करणेबाबतचा तपशील पुढीलप्रमाणे आहे :-

| **रोजंदारी मजूर म्हणून कार्यरत असलेल्या ०२ मजूरांचा तपशील** | | | | |
|---|---|---|---|---|
| अ.क्र. | नांव | जन्म तारीख | कालावधी | रक्कम |
| १ | श्री. रविंद्र गोपीनाथ गांगुर्डे | दि.०६/१०/१९७४ | दि.०६/०३/२००२ ते दि.३१/०७/२०२४ | रु.२२,५३,९३७/- |
| २ | श्री. काळु फुला सोनवणे | दि.०१/०६/१९६६ | दि.०६/०३/२००२ ते दि.३१/०७/२०२४ | रु.१०,९७,०१३/- |
| एकूण रक्कम | | | | रु.३३,५०,९५०/- |
| **अधिसंख्य वनमजूर म्हणून नियुक्ती देवून सेवेत घेण्याबाबत अर्ज केलेल्या ०४ मजूरांचा तपशील** | | | | |
| अ.क्र. | नांव | जन्म तारीख | थकबाकी अनुज्ञेयता दिनांक | थकबाकीची रक्कम |
| ३ | श्री. तुळशीराम काशीनाथ माळी | दि.०१/०६/१९७० | दि.०६/०३/२००२ | रु.१,०९,७८५/- |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ४ | श्री. कौतिक मोतीराम खैरनार | दि.०१/०६/१९६१ | दि.०६/०३/२००२ | रु.९४,२०२/- |
| ५ | श्री. पाटीलभाऊ देवराम अहिरे | दि.०१/०६/१९६६ | दि.०६/०३/२००२ | निरंक |
| ६ | श्री. शांताराम ऊखा अहिरे | दि.०२/०६/१९७१ | दि.०६/०३/२००२ | रु.२८,८५७/- |
| एकूण रक्कम | | | | रु.२,३२,८४४/- |

**गैरहजर असलेल्या ०९ मजूरांचा तपशील**

| अ. क्र. | नांव | जन्म तारीख | थकबाकीची अनुज्ञेयता | थकबाकीची रक्कम |
|---|---|---|---|---|
| ७ | श्री. यादव गणपत मोरे | दि.३०/०६/१९६२ | सन १९९८ पासून गैरहजर असल्याने, थकबाकी अनुज्ञेय नाही. | निरंक |
| ८ | श्री. कडू भावराव देसले | दि.०१/०३/१९५७ | दि.०६/०३/२००२ ते सन २००६ या कालावधीकरीता थकबाकी अनुज्ञेय आहे. | रु.२,९२,७००/- |
| ९ | श्री. अत्री गणपत अहिरे | दि.०१/०६/१९६१ | सन २००२ पासून गैरहजर असल्याने, थकबाकी अनुज्ञेय नाही. | निरंक |
| १० | श्री. पंढरीनाथ श्रावण कचवे | दि.०१/०६/१९५७ | दि.०६/०३/२००२ ते सन २००३ या कालावधीकरीता थकबाकी अनुज्ञेय आहे. | रु.३५,३१५/- |
| ११ | श्री. साहेबराव भावराव ह्याळीज | दि.०१/०१/१९४८ | दि.०६/०३/२००२ ते सन २००४ या कालावधीकरीता थकबाकी अनुज्ञेय आहे. | रु.४२,६४०/- |
| १२ | श्री. मोतीलाल धोंडू अहिरे | दि.०१/०१/१९५८ | सन २००१ पासून गैरहजर असल्याने, थकबाकी अनुज्ञेय नाही. | निरंक |
| १३ | श्री. अण्णा मुरलीधर अहिरे | दि.०१/०६/१९५६ | सन १९९७ पासून गैरहजर असल्याने, थकबाकी अनुज्ञेय नाही. | निरंक |
| १४ | श्री. मुरलीधर अंबर अहिरे | --- | सन १९९६ पासून गैरहजर असल्याने, थकबाकी अनुज्ञेय नाही. | निरंक |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १५ | श्री. आत्माराम संपत अहिरे | --- | सन २००० पासून गैरहजर असल्याने, थकबाकी अनुज्ञेय नाही. | निरंक |
| एकूण रक्कम | | | | रु.३,७०,६५५/- |

**मृत्यू झालेल्या ०५ मजूरांचा तपशील**

| अ. क्र. | नांव | जन्म तारीख | मृत्यु दिनांक | कालावधी | रक्कम |
|---|---|---|---|---|---|
| १६ | श्री. काशीनाथ हरी भामरे | दि.०१/०२/१९४४ | दि.२६/१०/२०११ | दि.०६/०३/२००२ | रु.५२,३३१/- |
| १७ | श्री. दिलीप लहानू वाडेकर | दि.१३/०६/१९५० | दि.२१/०१/२०१९ | दि.०६/०३/२००२ | रु.४,२११/- |
| १८ | श्री. मल्हारी लहानू राऊत | -- | दि.२७/०६/२०१२ | "काम नाही वेतन नाही" या तत्वानुसार दि.०६/०३/२००२ पासून | रु.१२,५३१/- |
| १९ | श्री. सावजी महारु कुवर | -- | | "काम नाही वेतन नाही" या तत्वानुसार दि.०६/०३/२००२ पासून | रु.६,५०४/- |
| २० | श्री. शांताराम बाबुराव वाघ | -- | | "काम नाही वेतन नाही" या तत्वानुसार दि.०६/०३/२००२ पासून | रु.१२,८५७/- |
| | एकूण रक्कम | | | | रु.८८,४३४/- |

BHAGWAN MARUTI SAWANT

Digitally signed by BHAGWAN MARUTI SAWANT
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=REVENUE AND FORESTS DEPARTMENT,
2.5.4.20=8EE89EB0AEC64F8BC0BDF8D85DDB4706D35ABD8B73C618E114EE98D5C9ECF57B, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=C7DBA1C6B5F7AB2A6CABC4F7EAD8CFA74F8F7A0FADCAC76D8F1CF22569F16BD3, cn=BHAGWAN MARUTI SAWANT
Date: 2026.07.30 10:56:39 +05'30'

**( भगवान सावंत )**

**उप सचिव, महाराष्ट्र शासन**